जनसंपर्क कक्ष

17 JUN 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संख्याशास्त्राची आंतरराष्ट्रीय परिषद गुरुवारपासून

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या सन्मानार्थ आयोजन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या संख्याशास्त्रातील योगदानाच्या सन्मानार्थ विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागातर्फे गुरुवार (ता. १९) ते शनिवार (ता. २१) दरम्यान 'अॅडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथडस्, डेटा सायन्स अँड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे.

'या परिषदेत देशविदेशांतील १५० हून अधिक संख्याशास्त्रज्ञ सहभागी होणार असून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांच्या बीजभाषणाने



डॉ. डी. टी. शिर्के

परिषदेस प्रारंभ होईल', अशी माहिती संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के हे भारताच्या आघाडीच्या संख्याशास्त्रज्ञांमध्ये गणले जातात. ते 'इंडियन सोसायटी फॉर प्रोबॅबिलिटी अँड स्टॅटिस्टिक्स'चे फेलो आहेत. संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख म्हणून नऊ वर्षे जबाबदारी सांभाळत असताना त्यांनी विद्यार्थ्यांना संख्याशास्त्राधिष्ठित उद्योगांत संधी मिळाव्यात, या हेतूने एम.एससी. (अप्लाइड स्टॅटिस्टिक्स अँड इन्फॉर्मेटिक्स) हा अभ्यासक्रम सुरू केला. त्यांच्या संख्याशास्त्रातील या योगदानाचा गौरव करण्याच्या हेतूने मिनिस्ट्री ऑफ स्टॅटिस्टिक्स अँड प्रोग्राम इम्प्लिमेंटेशन, रिझर्व बँक ऑफ इंडिया, नॅशनल बोर्ड फॉर हायर मॅथेमॅटिक्स आणि अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन यांच्या वित्तीय सहाय्याद्वारे ही परिषद आयोजित केली आहे. त्यासाठी अमेरिका, मलेशिया आणि ग्रीस येथील नामवंत संख्याशास्त्रज्ञांना निमंत्रित वक्ते म्हणून पाचारण करण्यात आले असल्याचे डॉ. महाडिक यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUN 2025
तरुण भारत

# कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या सन्मानासाठी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषद

- देश-विदेशातून १५० शास्त्रज्ञ सहभागी होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या संख्याशास्त्रातील योगदानाच्या सन्मानार्थ विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागाच्या वतीने १९ ते २१ जून या कालावधीत आंतरराष्ट्रीय परिषद घेण्यात येणार आहे. 'ॲडव्हान्सेस इन स्टॅटिस्टिकल मेथड्स, डेटा सायन्स ॲंड ऑफिशियल स्टॅटिस्टिक्स' हा या परिषदेचा विषय आहे. परिषदेत देशविदेशांतील १५० हून अधिक संख्याशास्त्रज्ञ सहभागी होणार असून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांच्या बीजभाषणाने परिषदेस प्रारंभ होईल, अशी माहिती संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी दिली.

डॉ. दिगंबर शिर्के १९९० साली संख्याशास्त्र अधिविभागात अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १६ विद्यार्थ्यांनी पीएच. डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी अमेरिका, पोर्तुगाल, जर्मनी, सिंगापूर, स्वित्झर्लंड, मलेशिया, थायलंड, नेदरलॅंड्स या देशांतील विद्यापीठांना भेटी देऊन संशोधनपर व्याख्याने दिली. कुलसचिव, रुसा समन्वयक आणि पुढे प्र-कुलगुरू व कुलगुरू ही पदे भूषविली. अधिसभा, विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषद अशा विविध अधिकार मंडळांवर त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली. या योगदानाचा गौरव करण्यासाठी ही परिषद घेण्यात येणार आहे. ३० ज्येष्ठ भारतीय संख्याशास्त्रज्ञ, भारतीय सांख्यिकी सेवेतील पाच अधिकारी, रिझर्व बॅंक ऑफ इंडियामधील दोन अधिकारीही सहभागी होणार आहेत. ही परिषद मिनिस्ट्री ऑफ स्टॅटिस्टिक्स ॲंड प्रोग्राम इम्प्लिमेंटेशन (भारत सरकार), रिझर्व बॅंक ऑफ इंडिया, नॅशनल बोर्ड फॉर हायर मॅथेमॅटिक्स, आणि अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशन यांच्या वित्तीय सहाय्याद्वारे आयोजित करण्यात आले.

17 JUN 2025

जनसंपर्क कक्ष
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ५०१ विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान

## ३७ लाख ७५ हजार रुपयांचे वाटप; १ हजार ९३७ अर्ज प्राप्त

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरणाचा समारंभ व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते नुकताच पार पडला. विविध महाविद्यालयांतील १ हजार ९३७ अर्जांपैकी ५०१ पात्र विद्यार्थी-विद्यार्थिनींना गुणवत्ता शिष्यवृत्ती विद्यापीठामार्फत प्रदान करण्यात आल्या.



**कोल्हापूर : विज्ञान व तंत्रज्ञान विभागातील शहरी गटातील प्रथम पुरस्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. ए. बी. कोळेकर. (छाया : अर्जुन टाकळकर)**

विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिकत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, यासाठी विद्यापीठ फंडातून 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती'ची निर्मिती करण्यात आली आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात संलग्नित महाविद्यालये, पदव्युत्तर अधिविभागांकडून १९३७ अर्ज आले. त्यामधून पात्र ठरलेल्या ५०१ विद्यार्थी, विद्यार्थिनींना ३७ लाख ७५ हजार रुपयांचे वाटप त्यांच्या बँक खात्यामार्फत करण्यात आले आहे.




प्राचार्यांचा सत्कार कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. प्राचार्य एस. एम. कदम, प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. पदव्युत्तर प्रवेश विभागाचे उपकुलसचिव टी. के. कुंडले यांनी आभार मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. ए. एन. जाधव, डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
17 JUN 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाचशे विद्यार्थ्यांना मिळाली ३७ लाखांची गुणवत्ता शिष्यवृत्ती

## शिवाजी विद्यापीठात उत्साहात वितरण



कोल्हापूर : विज्ञान व तंत्रज्ञान विभागातील शहरी गटातील प्रथम पुरस्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. ए. बी. कोळेकर. यावेळी शेजारी सुहासिनी पाटील, डॉ. पी. एस. पाटील, व्ही. एन. शिंदे, अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरणाचा समारंभ व्यवस्थापन परिषद सभागृहात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाला. विविध महाविद्यालयांतील एकूण एक हजार ९३७ अर्जांपैकी ५०१ पात्र विद्यार्थी-विद्यार्थिनींना ३७ लाख ७५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती विद्यापीठाने प्रदान केली.

यंदा विज्ञान व तंत्रज्ञान विभागात शिष्यवृत्ती मिळविण्यात विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग, शिवराज कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स, डी. एस. कदम सायन्स कॉलेज (गडहिंग्लज), संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (महागाव) यांनी बाजी मारली. वाणिज्य व व्यवस्थापन विभागात न्यू कॉलेज कोल्हापूर, शिवराज कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स, डी. एस. कदम सायन्स कॉलेज, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, तर मानवविज्ञान विभागात न्यू कॉलेज, डी. आर. माने महाविद्यालय कागल, पद्मभूषण डॉ. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी आर्टस् कॉलेज (झरे) आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यास विभागात कॉलेज ऑफ नॉन कनव्हेशनल व्होकेशनल कोर्स फॉर वुमेन कोल्हापूरने स्थान पटकावले.

या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आला. प्राचार्य प्रा. डॉ. आर. जी. कुलकर्णी, व्ही. एम. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. ए. एन. जाधव उपस्थित होते. पदव्युत्तर प्रवेश विभागाचे उपकुलसचिव टी. के. कुंडले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
17 JUN 2025
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञान अधिविभागातील १८० विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर, ता. १६ : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामधील २०२४-२५ यावर्षी १८० विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राइव्हमधून विविध राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विविध पदांवर निवड झाली आहे.

यावर्षी अधिविभागामधून अनेक नामवंत कंपन्यांनी विद्यार्थ्यांना सर्वसाधारणपणे वर्षाला तीन ते १० लाख रुपयांपर्यंतची पॅकेज देऊन निवड केलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने इन्फोसिस, टी.सी.एस., विप्रो, पारी, डेटाटेक लॅब, सी.एम.एस. कॉम्प्युटर इंडिया लि., जयश्री इलेक्ट्रॉनिक्स, अमूल, नेस्ले इंडिया लि., ब्रिटानिया, अदानी ग्रुप, एल. कॉम. इंटरनॅशनल प्रा. लि., क्रायसो इंडिया लि., टेक्निप एनर्जीज् प्रा. लि., टुडीप टेक्नॉलॉजी, टेको, व्ही. क्रियेटेक, प्रिवी फायनं सर्विसेस लि., वॉलचंदनगर इंडस्ट्रिज लिमिटेड, स्कॉन इन्फ्रास्ट्रक्चर, आर.डी.सी. काँक्रिट, गद्रे मरीन इक्स्पोर्ट प्रा. लि., आयनॉक्स एअर प्रॉडक्ट्स इत्यादी कंपन्यांचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील रोजगार संधी मिळाव्यात आणि तंत्रज्ञान अधिविभागाला संशोधन गुणवत्ता केंद्र बनवण्यासाठी विभागाचे संचालक डॉ. अजित कोळेकर, शिवाजी विद्यापीठ प्रशिक्षण व रोजगार कक्ष अधिकारी डॉ. राजन पडवळ, अधिविभागाचे प्रशिक्षण व रोजगार कक्ष अधिकारी डॉ. गणेश पाटील, शामल पवार आदी कार्यरत आहेत.

**व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रशिक्षण**

प्रत्येक विद्यार्थ्यास व्यक्तिमत्त्व विकासासाठी १२० तासांचे मोफत प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, गटचर्चा, मुलाखत यांची तयारी करून घेतली जाते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUN 2025

पुढारी

# ऑनलाईन जर्नालिझम, फोटोग्राफी, शॉर्टफिल्म मेकिंग कोर्सला प्रवेश सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात सुरु असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेन्ट्री फोटोग्राफी आणि सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

तिन्ही अभ्यासक्रम पार्ट टाईम आहेत. इतर कोणताही पूर्णवेळ अभ्यासक्रम शिकत असताना किंवा नोकरी आणि व्यवसाय करत अभ्यासक्रम पूर्ण करता येतात. विद्यापीठात फक्त शनिवार व रविवारी कोर्सचे प्रशिक्षण दिले जाते. तिन्ही कोर्ससाठी वयाची कोणतीही अट नाही. पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम हा पदवीनंतरचा एक वर्षाचा कोर्स आहे. कोर्सला प्रवेश घेण्यासाठी कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेन्ट्री फोटोग्राफी आणि सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्ट फिल्म मेकिंग हे दोन्ही कोर्स तीन महिने कालावधीचे असून ते बारावी पास असणाऱ्या कोणालाही करता येतात. तिन्ही अभ्यासक्रमासाठी अध्यासनात स्टुडिओ, विविध सॉफ्टवेअर्स, संगणक लॅब, कॅमेरे यासह अन्य सर्व सुविधा विद्यापीठाने उपलब्ध करून दिल्या आहेत. विद्यार्थ्यांनी कोर्सला प्रवेश घेण्यासाठी https :/// sukapps. unishivaji. ac. in/ pgentrance/#/ login या लिंकवर कागदपत्रे अपलोड करून नोंदणी करावी. कोर्सबाबत अधिक माहितीसाठी पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनात विद्यार्थ्यांनी सपर्क करावा, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUN 2025
पुण्यनगरी

# प्रा. एस. पी. थोरात यांना पीएच.डी.



**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील प्रा. संजय थोरात यांना शिवाजी विद्यापीठाकडून गणित विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी शिवाजी विद्यापीठ संलग्नित कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी येथील डॉ. संताजी खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनकार्य पूर्ण केले. त्यांना शिवाजी विद्यापीठाचे गणित विभागप्रमुख डॉ. एम. टी. गोफणे, प्रा. डॉ. सरिता ठकार, प्रा. के. डी. कुच्चे, प्रा. एस. पी. पाटणकर यांचे मार्गदर्शन लाभले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आदींचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 JUN 2025

पुण्यनगरी

# ‘सायन्स बिहाईंड स्पोर्टस्’ चर्चासत्रास प्रतिसाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे क्रीडापटूंसाठी आयोजित ‘सायन्स बिहाईंड स्पोर्टस्’ विषयावरील विशेष एकदिवसीय चर्चासत्रास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पोर्टस् न्यूट्रिशन व स्पोर्टस् सायकॉलॉजीच्या माध्यमातून स्टॅमिना, रिकव्हरी, फोकस व मानसिक ताकद वाढवण्यासाठी या चर्चासत्राचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते. अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक सुभाष पवार, डॉ. धनंजय पाटील आदी उपस्थित होते. क्रीडा मानसोपचारतज्ज्ञ अनघा देशपांडे, आहारतज्ज्ञ ऋषीकेश जांभळे, शुभम आगळे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन मनीषा शिंदे यांनी केले. सुचय खोपडे यांनी आभार मानले.